# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः17.02.2025** **वारःसोमवार**

---

•देशाच्या विविध भागातील वैशिष्टपूर्ण वस्त्रातून सांस्कृतिक विविधतेचं दर्शन घडत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन,
•कापूस खरेदी सुरू करण्याबाबत केंद्र सरकारशी चर्चा करणार असल्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही,
•राज्यातला साखर हंगाम अखेरच्या टप्प्यात; आतापर्यंत सुमारे ६१ लाख टन साखरेचं उत्पादन,
•नवी दिल्ली रेल्वे स्थानकावरील दुर्घटनेच्या चौकशीसाठी रेल्वेची समिती स्थापन.

**<u>पंतप्रधान</u>**

“देशाच्या विविध भागात तयार होणाऱ्या वैशिष्टपूर्ण वस्त्राच्या रूपानं देशाच्या सांस्कृतिक विविधतेचं दर्शन घडतं”, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नवी दिल्लीत भारत मंडपम् इथं आयोजित भारत टेक्स २०२५ मध्ये ते काल बोलत होते. “भारत टेक्स हा आता जागतिक पातळीवरचा महोत्सव झाला असून हे प्रदर्शन जगभरातल्या वस्त्र-उद्योजकांसाठी एक चांगलं व्यासपीठ बनलं आहे”, असं ते म्हणाले. वस्त्रोद्योगाच्या संदर्भात फार्म, फायबर, फॅब्रिक, फॅशन आणि फॉरेन हे पाच “एफ” घटक देशासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहेत; यातून शेतकऱ्यांपासून ते व्यापाऱ्यांपर्यंत सर्वांना प्रगतीच्या नव्या वाटा मिळत आहेत, असं पंतप्रधानांनी सांगितलं. आपण जगातला सर्वात मोठा कापड निर्यातदार देश आहोत. या क्षेत्रातली निर्यात आतापर्यंत तीन लाख कोटीं रुपयांवर गेली असून २०३०पर्यंत हीच निर्यात ९ लाख कोटींवर घेऊन जाणं हे आपलं लक्ष्य आहे, असंही मोदी यांनी सांगितलं. देशातील वैविध्यपूर्ण वस्त्रसंस्कृती जगभरात पोहोचवण्याची हीच योग्य वेळ आहे, असं सांगून मोदी म्हणाले -----

**<u>राष्ट्रपती</u>**

देशातील आदिवासी समुदायाच्या सर्वांगीण विकासासाठी गेल्या दहा वर्षात अनेक पावलं उचलण्यात आली असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत आयोजित आदि महोत्सव 2025 चं उद्घाटन काल राष्ट्रपतींच्या हस्ते झालं, त्यावेळी त्या बोलत होत्या. आदिवासी समुदायाचा विकास झाला तरच देश खऱ्या अर्थानं विकसित होईल असं सांगून, यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये आदिवासी विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधीची तरतूद करण्यात आली असल्याचं राष्ट्रपती म्हणाल्या. देशातील आदिवासींची संस्कृती, परंपरा प्रदर्शित करण्याच्या उद्देशानं या महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. यात सहाशेपेक्षा अधिक आदिवासी कारागीर, शिल्पकार आणि कलाकार सहभागी झाले आहेत.

**<u>मुख्यमंत्री</u>**

जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्यांची सीसीआयने बंद केलेली कापूस खरेदी पुन्हा सुरू करण्यासाठी केंद्रीय मंत्र्यांशी चर्चा करणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिली. शेंदुर्णी सहकारी संस्थेच्या अमृत महोत्सवानिमित्त अमृत ग्रंथ प्रकाशन आणि नूतन इमारतीचा पायाभरणी समारंभ फडणवीस यांच्या हस्ते झाला; यावेळी आयोजित शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यावेळी उपस्थित होते. शेतकऱ्यांचे प्रामुख्याने वीज आणि पाण्यासंदर्भातील प्रश्न सोडवण्याला शासनाने प्राधान्य दिलं असून सौर पंपासाठी पैसे भरलेल्या शेतकऱ्यांना पुढच्या १५ दिवसात आणि मागणी नोंदवल्यानंतर प्रत्येक शेतकऱ्याला दोन महिन्याच्या आत जोडणी देण्यात येईल, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**<u>फडणवीसचंद्रपूर</u>**

देशाच्या आणि सर्वसामान्य नागरिकांच्या विकासामध्ये आर्थिक संस्थांचा मोलाचा वाटा असतो, असं मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल चंद्रपूरमध्ये व्यक्त केलं. सन्मित्र महिला नागरी सहकारी बँकेच्या रौप्य महोत्सवी सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके, आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**<u>साखरहंगाम</u>**

राज्यातला साखर हंगाम आता अखेरच्या टप्प्यात आला आहे. आतापर्यंत सुमारे ६१ लाख टन साखरेचं उत्पादन झालं असून, १४ कारखान्यांनी आपली धुराडी बंद केली आहेत. सर्वाधिक १७ लाख टन साखर उत्पादन कोल्हापूर विभागात झालं; तर पुणे विभागात १४ लाख टन साखर उत्पादित करण्यात आली. यंदा राज्यात ८५ लाख टन साखर उत्पादनाचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता; मात्र यंदा गाळप हंगाम नेहमीपेक्षा उशिरा सुरू झाला; त्यातच अतिवृष्टीमुळे राज्यात उसाला तुरे येण्याचं प्रमाणही वाढलं होतं; अशा विविध कारणामुळे साखर उत्पादन अंदाजापेक्षा कमी होईल, तसंच यंदा गेल्या वर्षीच्या तुलनेत साखर गाळप हंगाम लवकर संपेल, असं साखर आयुक्तालयानं म्हटलं आहे.

**<u>इंट्रो</u>**

**<u>केळकरसंग्रहालय</u>**

विख्यात संगीतकार आणि पार्श्वगायक सी. रामचंद्र यांच्या वापरातला दुर्मीळ पियानो पुण्यातल्या राजा दिनकर केळकर संग्रहालयाला काल सुपूर्द करण्यात आला. सुरेश यादव यांनी हा पियानो संग्रहालयाकडे सुपूर्द केला. या पियानोचं सुयोग्य जतन राजा दिनकर केळकर संग्रहालयामध्ये होईल आणि पुढच्या पिढ्यांना तो पाहता येईल या सद्भावनेने हा निर्णय घेतला असल्याचं सुरेश यादव यांनी सांगितलं. याबाबत आकाशवाणीशी बोलताना संग्रहालयाचे संचालक सुधन्वा रानडे म्हणाले ----

**<u>नाशिक महापालिका अर्थसंकल्प</u>**

नाशिक महापालिकेने २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी ६६ कोटी ३० लाख रुपयांच्या शिलकीचं ३ हजार ५४ कोटी रुपयांचं अंदाजपत्रक काल स्थायी समितीला सादर केलं. दोन वर्षांनी होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळयासाठी पायाभूत सुविधा उभारण्यासाठी दोनशे कोटींच्या ठेवी मोडण्याचा निर्णय महापालिकेनं घेतला आहे.

**रुग्णालय**

सांगली जिल्ह्यातील मिरज इथं शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात मॉड्युलर आयसीयु आणि मॉड्युलर ऑपरेशन थिएटरचं लोकार्पण वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते काल करण्यात आलं. महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यातील गरीब रुग्णांना याचा फायदा होणार आहे.

**न्यायालय**

नवीन वकिलांनी पक्षकारांना न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीने सतत अध्ययन करायला हवं, असं प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे यांनी काल केलं. पुणे जिल्ह्यात जुन्नर इथं जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायाधीश आणि दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर या न्यायालयाचं उद्घाटन न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे यांच्या हस्ते झालं. त्यावेळी त्या बोलत होत्या. उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**न्यायालय**

तुळजापूरमध्येही काल वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय सुरू करण्यात आलं. या न्यायालयामुळे पक्षकारांना भूसंपादन आणि कौटुंबिक न्यायालयीन प्रकरणांसाठी धाराशिव जिल्हा न्यायालयात जाण्याची गरज राहिलेली नाही. या नव्या न्यायालयामुळे स्थानिक आणि तालुक्यातील नागरिकांना मोठी सुविधा उपलब्ध झाली आहे, असं प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अरुण पेडणेकर यांनी यावेळी केलं.

**नवीदिल्ली-रेल्वेस्थानक**

नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर शनिवारी रात्री चेंगराचेंगरी होऊन किमान १८ जणांचा मृत्यू झाला; या प्रकरणी चौकशी करण्यासाठी उत्तर रेल्वेचे मुख्य वाणिज्य व्यवस्थापक नरसिंह देव आणि मुख्य सुरक्षा आयुक्त पंकज गंगावार यांची समिती रेल्वेनं नेमली आहे. या समितीनं स्थानकावरचे सीसीटीव्ही फूटेज राखून ठेवायचे निर्देश दिले आहेत. प्रयागराजला जाणाऱ्या गाड्यांमध्ये चढण्यासाठी अचानक अलोट गर्दी झाली होती. या गर्दीत चेंगराचेंगरी झाल्याचं उत्तर रेल्वेच्या मुख्य जनसंपर्क अधिकाऱ्यांनी सांगितलं. मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी दहा लाख रुपयांची मदत रेल्वेनं जाहीर केली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेबद्दल तीव्र दु:ख व्यक्त केलं आहे. या दुर्घटनेची जबाबदारी स्वीकारून रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी काँग्रेसनं केली आहे.

**क्रीडा**

२६व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धा गडचिरोलीच्या गोंडवाना विद्यापीठात आजपासून सुरू होणार आहेत. येत्या २२ फेब्रुवारीपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेमध्ये राज्यातील २३ विद्यापीठांचे संघ सहभागी होत आहेत. या स्पर्धेमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सुमारे 150 खेळाडू आणि 25 संघ व्यवस्थापक, मार्गदर्शक यांचा चमू सहभागी होत आहे.

**हवामान**

उद्या सकाळपर्यंतच्या अंदाजानुसार, राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील, असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**